## -: प्रेस नोट :-

**पोलीस असल्याची बतावणी करून फिर्यादीकडून रु. ७४,२६६/- किंमतीची सोन्याची चैन जबरी चोरी करून पळुन गेलेल्या दोन आरोपींना बोरीवली पोलीस ठाण्याकडून २४ तासाच्या आत शिताफीने अटक**

दिनांक १०/०८/२०२६ रोजी ११.३० वा. ते १२.३० वा.चे दरम्यान यातील फिर्यादी श्री. वेदांत नयन मेहता, वय १८ वर्षे हे बीएमसी गार्डन गेट, आकाशवाणी केंद्र जवळ, गोराई, बोरीवली पश्चिम, मुंबई येथे असतांना एक अनोळखी मोटार सायकलस्वार वय २५ ते ३० वर्षे इसमाने तो डीटी पोलीस असल्याचे सांगून फिर्यादीचे कानाखाली मारून, नशा करत असल्याचे केसमध्ये अडकवण्याची धमकी देवून सेटनमेन्ट करीता फिर्यादीकडे पैशाची मागणी करून फिर्यादीने ते दिले नाही म्हणून फिर्यादीचे गळयातील अंदाजे १५ ग्रॅम वजनाची रू. २,००,०००/- किं.ची सोन्याची चैन जबरदस्तीने काढून घेवून तेथून निघून गेला.

बोरीवली पोलीस ठाणे हद्दीतील गोराई, बोरीवली पश्चिम, मुंबई परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पडताळणी केली तसेच तांत्रिक विश्लेषणदरम्यान, पो.उ.नि. राजू कोरडे यांना खात्रीशिर माहिती मिळाली की, अनोळखी मोटार सायकलस्वार वय २५ ते ३० वर्षे इसम हा अनमोल जाधव असून त्याचे साथीदार रोहन उमेश रेडकर वय २२ वर्षे व विर्तिक रविंद्रसिंग चौहाण, वय १८ वर्षे यांचा देखील नमुद गुन्हयात सहभाग असल्याबाबत माहिती मिळाली. प्राप्त माहितीनुसार रोहन उमेश रेडकर वय २२ वर्षे व विर्तिक रविंद्रसिंग चौहाण, वय १८ वर्षे यांना ताब्यात घेवून त्यांचेकडे कसुन तपास केला असता, त्यांनी अनमोल जाधव याच्या मदतीने फिर्यादीचे गळयातील अंदाजे १५ ग्रॅम वजनाची रू. २,००,०००/- किं.ची सोन्याची चैन जबरदस्तीने काढून घेतल्याचे निष्पन्न झाले. उपरोक्त नमुद आरोपींना बोरीवली पोलीस ठाणे, मुंबई गु.र.क्र. ११०७/२०२६कलम ३०८(२),३०९(४),२०४,३५१(२),११५(२),३(५) भा.न्या.स या गुन्हयामध्ये अटक करण्यात आली असून ते सध्या पोलीस कोठडीत आहेत.

**अटक आरोपीताचे नांव पत्ता :**

१) रोहन उमेश रेडकर वय २२ वर्षे, धंदा- नोकरी, रा.ठी. रु.नं. १०४, शांती सागर बिल्डींग, मॅक्सीस मॉल जवळ, गोराई रोड, गोराई-०३, बोरीवली प, मुंबई
२) विर्तिक रविंद्रसिंग चौहाण, वय- १८ वर्षे, रु.नं. ए-२४, प्लॉट नं. १८७, यशश्री को.ऑ.हौ.सो., प्रगती शाळेच्या पाठीमागे, गोराई-०३, बोरीवली प, मुंबई

गुन्हयातील दोन्ही अटक आरोपींकडून अंदाजे १५ ग्रॅम वजनाचा रू. २,००,०००/- किं.चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त, उत्तर परिमंडळ-२, मुंबई श्री. संदीप घुगे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. संतोष धनवटे, मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती. पुष्पलता मंडले यांच्या मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. दिग्विजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बोरीवली पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस उप निरीक्षक राजू कोरडे, पो.ह.क्र. ९७०७२२/संतोष देसाई, पो.ह.क्र. ००७३३/विनोद शेलार, पो.शि.क्र. ०९१७६०/विजय लहांगे, पो.शि.क्र. ११३६५०/राहुल झिरवा, पो.शि. क्र. १४००८४/योगेश कदम, पो.शि.क्र. १११८०९/नरेश जाधव यांनी अथक तपास करून बजावली.

--००--